जा.क्र.10/जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा

दिनांक : 06/01/2018

| अ. क्रं | पो.ठाणे गु.र.नं. व कलम | फिर्यादीचे पुर्ण नांव, व पत्ता | आरोपीचे पुर्ण नाव, व पत्ता | घटना स्थळ व घटना ता. व वेळ | गुन्हा दाखल ता. व वेळ | घटना स्थळ | गुन्हयाची थोडक्यात हकीकत तपासणी अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | 3 | 4 | 5 | | 6 | |
| 1 | भंडारा<br>अप.क. 15/2019 कलम 379 भादंवि | मोहन दादु कडव वय 58 वर्ष रा. शिवनगरी खात रोड भंडारा | अज्ञात | 04/01/2019 चे 16.00 वा. दरम्यान | 05/01/2019 चे 14.09 वा. | अनाज दुकानसमोर छोटा बाजार भंडारा | यातील फियादीने छोटा बाजार भंडारा येथे आपली हिरो होंन्डा कंपनीची सि.डि. डिलक्स काळया रंगाची क. एम.एच 36 ई.4563 कि. 20,000/-रु. ची अनाज दुकानासमोर गाडीस उभी करुन भाजीपाला घेण्याकरीता गेला व अर्ध्या तासांनी ठेवलेल्या ठिकाणी मोटार सायकल पाहिली असता गाडी मिळून न आल्याने कोणीतरी अज्ञात आरोपीने मोटार सायकल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस हवालदार भुसावळे हे करीत आहेत. मो. नं. 8888792790 |
| 2 | लाखांदुर<br>अप.क.5/19 कलम 461,380 भादंवी | जिर्तेंद्र मनोहर नंदपुरे वय 23 वर्ष रा. विरली बुज. | अज्ञात | 4/1/19 चे 19.00 वा. ते 5/1/19 चे 09.30वा. दर. | 5/1/19 चे 17.06 वा. | विरली /बुज. 20 कि.मी. पश्चिम | यातिल फिर्यादीने आपले सलुन दुकानाचे गल्ल्यांत एकुन 5,700 रु. ठेवले असता गल्ल्यांची चाबी दुकानात ठेवुन सलुन दुकानाचे दरवाज्याला ताला न लावता दार टेकुन घरी निघुन गेला. कोणीतरी अज्ञात आरोपीने सलुन दुकानाचा दार ढकलुन आत प्रवेश करुन गल्ल्यांतील नगदी 5,000 रु. चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस हवालदार उईके हे करीत आहेत. मो. नं.9604037933 |
| 3 | तुमसर<br>अप. क: 07/19 कलम 302 भादंवी | सौ. रिता साहिल शेंदरे वय 20 वर्षे रा. गौतम नगर (15खोली) तुमसर | अज्ञात | 05/01/19 चे सकाळी 05.00 ते 08.00 वा. दर. | 05/01/19 चे 12.10 वा. | नेहरु ग्राऊन्ड तुमसर 1 कि.मी. पश्चिम | यातील मृतक साहिल ललीत शेंदरे वय 20 वर्ष हे गांधी वार्ड तुमसर येथील रहिवासी असुन नगर परीषद तुमसर येथे कंत्राटी सफाई कामगार आहेत. यातील मृतक हा नगर परीषद रोडाची साफ सफाई करणे कामी गेले असता. कोणीतरी अज्ञात आरोपीने तिक्ष्ण हत्याराने मृतकचे गळयावर वार करुन जिवानीसी ठार केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक उबाडे हे करीत आहेत. मो. नं. 8830332007 |
| 4 | साकोली<br>अप.क. 4/19 कलम 279,337 भादंवी. सहकलम 184 मोवाका. | दिनेश मोतीराम संग्रामे वय 24 वर्ष रा. शिवाजी वार्ड साकोली | मो.सा. क. एम.एच.36 वाय. 4428 चा चालक | 29/12/18 चे 10.00 वा. दर. | 5/1/19 चे 19.05 वा. | गडकुंभली रोड साकोली 12 कि.मी. पुर्व | यातिल फिर्यादीचे वडील मोतीराम ईस्तारी संग्रामे वय 67 वर्ष रा. शिवाजी वार्ड साकोली हे लाखांदुर फाटा साकोली येथुन दुध विकी करुन सायकलने घरी जात असता मागेहुन येणा-या यातील आरोपी मोटार सायकल चालकाने आपल्या ताब्यातील मो.सा. भरधाव वेगाने, हयगईने चालवुन फिर्यादीचे वडिलांचे सायकलला धडक मारुन फिर्यादीचे वडिला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने वैद्यकीय परीक्षण रिपोर्ट व फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस हवालदार बागडे हे करीत आहेत. मो. नं. 9960273167 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | पवनी<br>अप. क. 03/19<br>कलम<br>188,272,273,<br>भादंवी. सहकलम<br>26(2)(आय),<br>26(2)(आयव्ही),<br>27(3)(इ),3(1)<br>(झेडझेड)<br>(आयआयआय),30<br>(2)(ए), 59 अन्न<br>सुंरक्षा मानके<br>अधिनियम 2006 | सरतर्फे भाष्कर नंदनवार वय 54 वर्षे धंदा नौकरी, अन्न सुरक्षा अधिकारी अन्न व औषधी प्रशासन (महाराष्ट्र) विभाग भंडारा रा. मातृ स्मुर्ती नगर, तकिया वार्ड भंडारा | शंकर मुरलीधर बिसने वय 38 वर्षे रा. गणेश वार्ड पवनी | 4/1/19 चे 19.00 ते 23.30 वा. दर. | 05/01/19 चे 00.45 वा. | गणेश वार्ड पवनी अर्धा कि.मी. दक्षिण | यातिल आरोपीने शासनाने प्रतिबंधीत केलेल्या व बंदी घातलेल्या आरोग्यास हानी कारक व नशा कारक व घातक अशी चांदणी तबांखुचे 38 पॅकेट 7 किलो 600 ग्रॅम कि. अं 2280/रु, सागर तंबाखुचे 8 पॅकेट 4 कि.लो. किंमत अंदाजे 480 रु. असा एकुण 2760/रु. ची सुगंधीत तंबाखु या अन्न पदार्थाची विकी करीता साठवणुक करुन शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस हवालदार ढाकने हे करीत आहेत. मो. नं. 7038989663 |
| 6 | साकोली<br>मर्ग.क. 2/19<br>कलम 174 जा.फौ. | सरतर्फे फिर्यादी गि–हेपुंजे ब.न. 910 पो.स्टे. साकोली | **मृतक** :– विलास पुंडलीक कडुकर वय 28 वर्ष रा. लवारी उमरी ता. साकोली | 3/1/19 चे 21.45 वा. दर. | 5/1/19 चे 22.15 वा | लवारी/उमरी /सा. रु. भंडारा | यातील मृतकची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यास औषधोपचाराकरीता उपजिल्हा रुग्णालय साकोली येथे नेवून प्रथमोपचार करुन तेथील डॉक्टरनी रेफर केल्याने त्यास पुढील उपचारास सा.रु. भंडारा येथे नेवून भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमोवरुन पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क. 00/19 कलम 174 जा.फौ. चे कागदपत्र टपालद्वारे पो.स्टे.ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोलीस नायक गि–हेपुंजे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस नायक परशुरामकर हे करीत आहेत. मो. नं. 9423414650 |
| 7 | लाखणी<br>मर्ग.क. 01/19<br>कलम 174 जा.फौ | उमेश सदाशिव चन्ने वय 29 वर्षे रा. इंदीरा नगर टोली केसलवाडा/वाघ | **मृतक** :– गुनेश दामोधर वैद्य वय 35 वर्षे रा. केसलवाडा/वाघ | 05/01/19 चे 05.30 वा.दर. | 05/1/19 चे 08.22 वा. | केसलवाडा/वाघ 7 कि.मी. पश्चिम | यातिल मृतक याने स्वतःचे घरी मधल्या रुम मध्ये फाट्याला सुती रस्सी बांधुन गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस हवालदार राठोड हे करीत आहेत. मो. नं. 9552561845 |

पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्या.भंडारा

प्रति,
जिल्हा माहीती अधिकारी, भंडारा
दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द
करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.
प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता